www.sarkarrajpress.com

# सरकार राज

Email: sarkarraj.gurav3@gmail.com

वर्ष : २० अंक : २४ ठाणे दि. २६ मे ते १ जून २०२६ RNI No. MAHMAR/2009/34640 पाने - ४

## अतिक्रमण विभागाच्या वतीने घणसोलीत निष्कासनाची कारवाई

**नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृतबांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा.आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ.राहुल गेठे व उपआयुक्त (अतिक्रमण/अ.बां.नि.वि.) संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने घणसोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



नवीमुंबई महानगरपालिका विभाग कार्यालय घणसोली एकनाथ शांताराम पाटील, (घरमालक), स्व.चांगोशेठ चौक, साळवीनगर, गोठवली, घणसोली, नवी मुंबई यांनी अनधिकृत बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही पुर्वपरवानगी न घेता सुरू केले होते. सदरील अनधिकृत बांधकामांस घणसोली विभागामार्फत नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते. परंतु अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते.

सदर अनधिकृत बांधकामावर नवी मुंबई महानगरपालिकेकडून तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. त्यानुसार सदरील अनधिकृत बांधकाम हटविणेपोटी १२ कामगार, ४ ब्रेकर, १ गॅसकटर सोबत या धडक मोहिमेसाठी घणसोली विभागासोबत बेलापूर विभाग व नेरुळ विभागातील अधिकारी/कर्मचारी आणि नमुंमपा पोलीस पथक तैनात होते. सदर अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई करण्यात आली.

## ऐरोली कार्यालयामार्फत अनधिकृत बांधकामावर तोडक मोहिम



**नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व मा.अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व मा. उप आयुक्त (अतिक्रमण/अ.बां.नि.वि.) संजय शिंदे, यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली कार्यालया अंतर्गत घर क्र- १६६, ऐरोली गाव, ऐरोली, नवी मुंबई येथे हितेश किशोर कोटकर यांनी बांधकाम परवानगी व्यतिरिक्त अनधिकृतपणे बांधकाम सुरु केले होते.

हितेश किशोर कोटकर, घर क्र- १६६, ऐरोली गाव, ऐरोली, नवी मुंबई यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामांस जी विभाग कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये दि. १६.०४.२०२६ रोजी नोटीस बजाविण्यात आलेली होती.संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविने आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. सदरचे अनधिकृत बांधकाम श्रीम.साधना पाटील,सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी ऐरोली,यांचे नियंत्रणाखाली तोडक मोहिमेचे आयोजन करुन सदर अनधिकृत बांधकाम अंशत:निष्कासित करण्यात आले.

## नवी मुंबई बेपत्ता मुलीचा शोध न घेता पालकांवरच गुन्हा

### रबाळे पोलीस ठाण्यातील प्रकारामुळे संताप

**नवी मुंबई :** नवी मुंबईत मुली बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असताना, बेपत्ता मुलीचा शोध घेण्याची मागणी करणाऱ्या कुटुंबीयांवरच पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याने संताप व्यक्त केला जात आहे. रबाळे पोलीस ठाण्यात सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी सात जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाची शहरात जोरदार चर्चा सुरू आहे.

रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३९०/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १३२, १८९(१), १८९(२) आणि १९० अन्वये हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात तीन वर्षांपर्यंत कारावासाची तरतूद आहे.

या प्रकरणातील फिर्यादी हे रबाळे पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक युनूस इब्राहिम शेख (वय ५४) असून आरोपींमध्ये सचिन सुभाष राठोड (२२), राह्रीत राजू राठोड (२२), राजू पांडू राठोड (४३), राजू चंदू राठोड (३८) यांच्यासह अन्य चार ते सहा अनोळखी इसमांचा समावेश आहे. सर्व आरोपी मूळचे कर्नाटक राज्यातील यादगीर जिल्ह्यातील असून सध्या बदलापूर येथे राहत असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, संबंधित कुटुंबातील मुलगी दोन दिवसांपासून बेपत्ता होती. तिचा शोध घेण्याबाबत माहिती मिळत नसल्याने २१ मे २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७.४५ वाजता कुटुंबीय रबाळे पोलीस ठाण्यात गेले. त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सावंत यांची भेट घेऊन मुलीचा शोध घेण्याची(उर्वरीत पान २ वर)

## नवी मुंबई पोलीस कर्मचारी बदली प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

### प्रतिनियुक्ती व अंतर्गत बदल्यांमध्ये तफावत असल्याची चर्चा

**नवी मुंबई :** नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील बदली प्रक्रिया, प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांचा दीर्घकालीन कार्यकाळ आणि अंतर्गत बदल्यांमधील कथित तफावत यामुळे पोलीस दलात नाराजीचे वातावरण निर्माण झाल्याची चर्चा सध्या पोलीस वर्तुळात सुरू आहे. विशेषत: अकार्यकारी शाखांमध्ये अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या होत नसल्याने आणि प्रतिनियुक्तीवर गेलेले कर्मचारी मूळ घटकात परत न बोलावल्याने पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

विशेष शाखा, सुरक्षा शाखा, गुन्हे शाखा, नियंत्रण कक्ष, वायरलेस विभाग, सीसीटीव्ही कमांड कंट्रोल, वाहतूक शाखा तसेच विविध अकार्यकारी विभागांमध्ये काही कर्मचारी अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत. दुसरीकडे पोलीस ठाण्यांमध्ये नियुक्त कर्मचारी मात्र सतत तणावपूर्ण व जबाबदारीच्या कामात गुंतलेले असल्याने त्यांच्यावर अतिरिक्त ताण येत असल्याचे बोलले जात आहे. (उर्वरीत पान २ वर)

## नवी मुंबईत शिवसेना (उबाठा)चा नाले सफाई पाहणी दौरा

नवी मुंबई : पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील सुरू असलेल्या नाले सफाई कामांचा पाहणी दौरा पार पडला. या दौऱ्याची सुरुवात इंदिरानगर येथील अमूल डेअरीजवळील नाल्यापासून करण्यात आली. यावेळी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी विविध भागातील



नाले सफाई कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. सुरू असलेल्या कामांच्या दर्जाची तपासणी करत स्थानिक नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या आणि तक्रारी जाणून घेण्यात आल्या.

पावसाळ्यात नागरिकांना पाणी तुंबणे, अस्वच्छता आणि पूरस्थितीचा सामना करावा लागू नये, यासाठी नाले सफाईची कामे प्रभावीपणे आणि वेळेत पूर्ण व्हावीत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

स्थानिक प्रशासनाने नाले सफाई कामांमध्ये कोणतीही हलगर्जीपणा करू नये तसेच नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, असेही यावेळी उपस्थितांकडून सांगण्यात आले.

# आयुक्त शिंदे यांनी सायकलवर अधिका-यांसमवेत केला पाहणी दौरा

**नवी मुंबई :** पंतप्रधान महोदयांनी पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर देशवासियांना केलेल्या आवाहनाच्या अनुषंगाने व त्यानुसार महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सकाळी ६ पासून ९ वाजेपर्यंत बेलापूर व नेरूळ विभागात अधिका-यांसमवेत सायकल चालवत पाहणी दौरा केला.



याप्रसंगी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या समवेत शहर अभियंताशिरीष आरदवाड, अतिरिक्त शहर अभियंता श्री.अरविंद शिंदे, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ. अजय गडदे, परिमंडळ १ उपआयुक्त श्री.सोमनाथ पोटरे, बेलापूर विभागाचे सहा.आयुक्त श्री.प्रशांत नेरकर या अधिका-यांनीही सायकल चालवत पाहणी दौ-यात सहभाग घेतला.

नेरूळ सेक्टर १ येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून पाहणीला सुरूवात करीत शिरवणे, सारसोळे, कुकशेत, करावे, ज्वेल ऑफ नवी मुंबई परिसर, सीवूड रेल्वेवरील उड्डाणपूल, पारसिक हिल, इन्कम टॅक्स कॉलनी, आग्रोळी येथील जलउदंचन केंद्र अशा विविध भागातील स्वच्छता, शौचालये, उद्याने, मार्केट, सायकल ट्रॅक, पम्प हाऊस अशा विविध बाबींची त्यांनी सायकलवर पाहणी करीत आवश्यक त्या ठिकाणी थांबत संबंधित अधिका-यांना सुधारणांविषयक मौलिक सूचना केल्या.

विशेषत्वाने शिरवणे, सारसोळे, कुकशेत, करावे अशा गावांच्या परिसराची पाहणी करताना तेथील स्वच्छतेमध्ये अधिक सुधारणा करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. गावठाणांच्या बाजूला असलेल्या सेक्टर भागातही स्वच्छतेवर अधिक भर देण्याच्या सूचना करण्यात आल्या.

शिरवणे जुईनगरच्या चिंचोली उद्यानाची सुधारणा करावी असे निर्देशित करतानाच तेथील शौचालय सुस्थितीत असून त्याप्रमाणे इतर शौचालयांची स्थिती ठेवावी असे त्यांनी सूचित केले. विशेषत्वाने पाम बीच रोडवर वझिराणी स्पोर्ट्‌सच्या कॉर्नरला पुढे असलेले शौचालय काहीसे पाठीमागे सरकवावे असे आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले.

सारसोळे येथील आरोग्यवर्धिनी केंद्राच्या आसपासच्या परिसराची स्वच्छता करून घ्यावी तसेच त्या ठिकाणचे मार्केटचे काम लवकरात लवकर करून ते उपयोगात आणावे असेही निर्देश आयुक्तांनी दिले. करावे गावाच्या कॉर्नरलाही नागरिकांची गरज लक्षात घेऊन मार्केट बनविण्याचे त्यांनी सूचित केले.

काही ठिकाणी रिकाम्या प्लॉट टवर नागरिक कचरा आणून टाकतात हे पाहणी दरम्यान लक्षात येताच त्याला प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना कराव्यात तसेच ते प्लॉट स्वच्छ करून घ्यावेत असे आयुक्तांनी निर्देश दिले. सेक्टर २८ आग्रोळी येथे पारसिक हिलच्या पायथ्याशी असणा-या पम्प हाऊसची तसेच स्काडा प्रणालीची बारकाईने पाहणी करीत आयुक्तांनी काही सुधारणा सुचविल्या.

# हाजी शहनवाज खान यांची नवी मुंबई आणि पनवेल महापालिकेकडे मागणी

**नवी मुंबई :** बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिका आणि पनवेल महानगरपालिकेमार्फत करण्यात येणाऱ्या खर्च व विविध व्यवस्थांमध्ये पूर्ण पारदर्शकता आणावी, अशी मागणी ऑल इंडिया उलमा कौन्सिलच्या माध्यमातून हाजी शहनवाज खान यांनी केली आहे.

दरवर्षी ''फेस्टिव्हल मॅनेजमेंट'',''सॅनिटेशन'', ''पब्लिक हेल्थ'', ''लॉ अँड ऑर्डर को-ऑर्डिनेशन'' तसेच ''कुर्बानी व्यवस्थापन'' या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो. मात्र या खर्चाचा संपूर्ण तपशील नागरिकांसमोर मांडला जात नाही, असा आरोप करण्यात आला आहे.

मुख्य मागण्या मध्ये बकरी ईद २०२६ साठी मंजूर करण्यात आलेल्या निधीची माहिती जाहीर करण्यात यावी. कोणत्या कंत्राटदार व एजन्सींना किती रक्कम देण्यात आली याची यादी प्रसिद्ध करण्यात यावी. तात्पुरते कत्तलखाने आणि कुर्बानी व्यवस्थेवरील खर्चाचा संपूर्ण तपशील जाहीर करण्यात यावा. सफाई कर्मचारी, गार्बेज व्हॅन, डंपर, जेसीबी , टँकर आणि वाहतूक व्यवस्थेवरील खर्च सार्वजनिक करण्यात यावा. खर्चाचा अहवाल पोर्टलवर अपलोड करण्यात यावा. सर्व टेंडर, वर्क ऑर्डर, बिल आणि पेमेंट व्हाऊचर्स नागरिकांसाठी उपलब्ध करून द्यावेत. आरोग्य विभाग, पशुवैद्यकीय पथक आणि निर्जंतुकीकरण फवारणीवरील खर्चाचा ऑडिट अहवाल जाहीर करण्यात यावा. अशी मागणी मागणी प्रशासनाकडे केली आहे.

# एनएमएमटी कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकपणाला सलाम !

**नवी मुंबई :** एनएमएमटी नवी मुंबई महानगरपालिका उपक्रमाच्या आसूडगाव डेपोतील कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणाचे उदाहरण घालून दिले आहे.

प्रवाशाचे हरवलेले रुपये ३३६० रोख रक्कम व दीड तोळे सोन्याचे दागिने मिळाल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने प्रवाशाशी संपर्क साधून त्यांचे मौल्यवान साहित्य सुरक्षितपणे परत केले. आजच्या काळात अशा प्रामाणिक कामगिरीमुळे NMMT कर्मचाऱ्यांच्या कार्यतत्परता व प्रामाणिकतेला सलाम करावा लागेल. त्यांच्या या कृतीमुळे



प्रवाशांचा सार्वजनिक सेवांवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

अशा प्रामाणिक कर्मचाऱ्यांचा सन्मान होणे गरजेचे असून त्यांच्या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## शोध न घेता पालकांवरच गुन्हा (पान १ वरुन)

मागणी केली. मात्र यावेळी पोलीस ठाण्यात मोठा गोंधळ झाल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. फिर्यादीनुसार, आमची मुलगी शोधून द्या, अन्यथा आम्ही पोलीस स्टेशन सोडणार नाही, अशी भूमिका घेत संबंधितांनी पोलीस ठाण्यात आरडाओरडा केला. पोलिसांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी आक्रमक भूमिका घेत सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याचा आरोप आहे.

या गोंधळामुळे पोलीस ठाण्यात आलेल्या इतर तक्रारदारांच्या कामावर परिणाम झाला. काही नागरिक भीतीपोटी पोलीस ठाण्यातून निघून गेल्याचेही पोलिसांनी नमूद केले आहे. त्यानंतर संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

दरम्यान, नवी मुंबईत अल्पवयीन मुली आणि महिलांच्या बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. अशा परिस्थितीत मुलीचा शोध घेण्याची मागणी करणाऱ्या पालकांवरच गुन्हा दाखल झाल्याने अनेक सामाजिक संघटना आणि नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. बेपत्ता मुलींचा तातडीने शोध घेण्यासाठी विशेष यंत्रणा उभारण्याची गरज आहे, अशी मागणीही पुढे येत आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास रबाळे पोलीस ठाण्याचे अधिकारी करत आहेत.

## नवी मुंबई पोलीस कर्मचारी बदली प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह (पान १ वरुन)

याशिवाय, नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील अनेक कर्मचारी हे प्रतिनियुक्तीवर सीआयडी, एसआयडी, दहशतवाद विरोधी पथक, नागरी हक्क संरक्षण विभाग, अँटी करप्शन ब्युरो तसेच सीबीआय यांसारख्या विभागांमध्ये अनेक वर्षांपासून कार्यरत असल्याचे सांगितले जात आहे. नियमांनुसार प्रतिनियुक्तीचा कालावधी मर्यादित असतानाही काही कर्मचाऱ्यांचा कार्यकाळ पाच वर्षांपेक्षा अधिक काळ सुरू असल्याची चर्चा आहे. त्यामुळे इतर पात्र आणि अनुभवी कर्मचाऱ्यांना त्या विभागांमध्ये काम करण्याची संधी मिळत नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे.

काही कर्मचाऱ्यांनी असा आरोप केला आहे की, प्रतिनियुक्तीसाठी दिलेले अर्ज वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचतच नाहीत. वारंवार अर्ज करूनही त्यांची दखल घेतली जात नसल्याने अनेक कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष वाढत आहे. तसेच प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांना मूळ घटकात परत बोलावण्यासाठी कोणतीही प्रभावी प्रक्रिया राबवली जात नसल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

पोलीस आयुक्तांच्या उपस्थितीत दर महिन्याला आस्थापना शाखेची बैठक होणे अपेक्षित असतानाही या बैठकीत अशा प्रश्नांवर चर्चा का होत नाही, असा सवाल उपस्थित केला जात आहे. काही कर्मचाऱ्यांनी यामागे आर्थिक हितसंबंध तर नाहीत ना, अशी शंका व्यक्त केली आहे. महिला कर्मचाऱ्यांमध्येही या प्रक्रियेबाबत नाराजी असल्याचे समोर येत आहे. लहान मुलांची जबाबदारी, आरोग्य समस्या किंवा कौटुंबिक कारणे सांगून अनेक महिला कर्मचाऱ्यांनी अकार्यकारी शाखांमध्ये बदलीसाठी अर्ज केले होते. मात्र आवश्यक कागदपत्रे आणि मेडिकल कारणे सादर करूनही त्यांच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप केला जात आहे.

दरम्यान, काही कर्मचाऱ्यांची संपूर्ण सेवाकाळात पोलीस ठाण्यात नियुक्ती झालेली नाही, तर काहींना वारंवार सोयीस्कर शाखांमध्ये बदली मिळत असल्याची चर्चा पोलीस दलात सुरू आहे. त्यामुळे बदलीसाठी नेमके कोणते निकष लावले जातात, याबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत.

पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांना गुन्हे तपास, नाकाबंदी, बंदोबस्त, आरोपींना न्यायालयात हजर करणे, पेट्रोलिंग, ठाणे अंमलदार कर्तव्य अशा जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतात. तर दुसरीकडे आयुक्त कार्यालयातील काही शाखांमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ६ अशी वेळ असली तरी अनेक कर्मचारी ११ नंतर कार्यालयात येत असल्याची चर्चा आहे.

# दीपक पवार यांच्या ‘अ’ प्रभाग समिती अध्यक्षतेखाली बेलापूरमधील नालेसफाईची पाहणी







**नवी मुंबई :** आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर बेलापूर विभागातील पावसाळी नाल्यांच्या स्वच्छता आणि देखभाल कामांना गती देण्यात आली आहे. ‘अ’ प्रभाग समितीचे अध्यक्ष दीपक पवार यांच्या अध्यक्षतेखाली वॉर्ड अधिकारी तसेच स्थानिक नगरसेवकांनी बेलापूर परिसरातील नालेसफाई कामांची प्रत्यक्ष पाहणी केली.

या पाहणी दौऱ्यात विविध ठिकाणच्या पावसाळी नाल्यांची स्वच्छता, गाळ काढण्याची कामे आणि पाण्याचा सुरळीत निचरा होण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. संबंधित अधिकऱ्यांना आवश्यक सूचना देत नालेसफाईची कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यावर भर देण्यात आला.

बेलापूर विभाग कार्यालयाच्या हद्दीतील सर्व पावसाळी नाले स्वच्छ व चकाचक ठेवण्याचे उद्दिष्ट ठेवून प्रशासनाकडून विशेष मोहीम राबविण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. पावसाळ्यात नागरिकांना पाणी साचणे, पूरसदृश्य परिस्थिती किंवा अन्य अडचणी निर्माण होऊ नयेत यासाठी प्रशासन सज्ज असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## नवी मुंबई शहर पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक संदर्भात कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण

**नवी मुंबई :** महानगरपालिका शहर पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक २०२६ अंतर्गत गुरूवार दिनांक ०४ जून २०२६ रोजी होणाऱ्या मतदानासाठी मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी आज दिनांक २१ मे, २०२६ रोजी ज्ञानकेंद्र, मुख्यालय येथे दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत मतदान अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर प्रशिक्षण कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी निवडणूक निर्णय अधिकारी अजय साबळे हे उपस्थित होते.

प्रशिक्षणामध्ये निवडणुकीचा उद्देश, मतदान कार्यपद्धती, मतमोजणी प्रक्रिया तसेच निवडणूक प्रक्रियेत अधिकारी व कर्मचारी यांच्या जबाबदाऱ्या आणि भूमिका याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी निवडणुकीचा संपूर्ण कार्यक्रम विषद करून मतदान विषयक पूर्वतयारी, आचारसंहिता, मतदानासंदर्भातील सार्वजनिक प्रसिद्धी तसेच विविध कायदेशीर बाबींची माहिती उपस्थितांना देण्यात आली. त्याचप्रमाणे पिंपळसे यांनी मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक वाहन व्यवस्थापन आराखड्याविषयी सविस्तर माहिती दिली.

यावेळी महानगरपालिकेच्या सर्व विभागांचे विभाग अधिकारी तसे निवडणूकीसाठी नियुक्त कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी दिलीप गायकवाड यांनी केले.

## मतदार यादीत नाव राहण्यासाठी एसआयआर कार्यक्रमांतर्गत मॅपींग करून घेणे अनिवार्य

**नवी मुंबई :** निवडणुकीच्या मतदार याद्या अद्ययावत तसेच अधिक अचूक व पारदर्शक करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या वतीने मतदार याद्या विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.या अंतर्गत सन २०२४ च्या लोकसभा व विधानसभा निवडणूकीमध्ये तयार करण्यात आलेल्या मतदार यादीतील मतदारांच्या नावाची सन २००२ मधील अंतिम मतदार यादीतील मतदारांच्या नावाशी ताळमेळ घालण्याची कार्यवाही (SIR Mapping) सुरु करण्यात आलेली आहे.

**विशेष पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) काय आहे?**

मतदारांनी आपले नाव विद्यमान २०२४-२५च्या मतदार यादीत असल्याची खातरजमा करून घेणे व सन २००२ मधील मतदार यादीतील नावाशी पडताळणी व जुळवणी करून घेणे.

सन२०२४-२५मधील ज्या मतदारांची वयपूर्तता नसल्याने२००२च्या मतदार यादीत नाव समाविष्ट नव्हते अशा मतदारांनी त्यांच्या नावाचे मॅपींग त्यांचे आई-वडील व वडीलांकडील आजी-आजोबा यांचे सन२००२च्या यादीतील नावाशी करून घेणे.

ज्यांची नावे सन २००२च्या मतदार यादीत नाही त्यांचेकडून प्रत्यक्ष SIR दरम्यान जन्माचे पुरावे घेणे

**मॅपींग कशासाठी करावयाचे?**

याव्दारे भारतीय नागरिकत्वाची पडताळणी होणार असून मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची ही सर्वात महत्वाची अर्हता आहे.

नावाची पडताळणी व जुळवणी (Mapping) न केल्यास आपले नाव मतदार यादीत राहणार नाही.

याचा थेट परिणाम नागरिकत्वामुळे मिळणा-या लाभांवर होईल.

मतदार यादीशी जोडून राहण्यासाठी सन २००२ मधील मतदार यादीत आपले स्वत:चे नाव असण्याचे अथवा नाव नसल्यास आपले आई-वडील किंवा आजी-आजोबा यांच्या नावाचे पुरावे सादर करणे,त्यांची पडताळणी करून घेणे ही प्रक्रिया करावी लागणार आहे.

त्यामुळे मॅपींग करणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे याची जाणीव ठेवून प्रत्येक नागरिकाने मॅपींग करून घेणे गरजेचे आहे.

या अनुषंगाने प्रत्येक मतदाराने २००२ च्या मतदार यादीतील आपले नाव व विद्यमान२०२४च्या यादीतील आपले नाव याची पडताळणी व जुळवणी (Mapping)करून घ्यायची आहे.

# जनगणना पहिल्या टप्प्यातील कामाला नवी मुंबईत वेग

**नवी मुंबई :** भारत सरकारच्या जनगणना २०२७ च्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात जनगणनेच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात झालेली आहे. यंदाची जनगणना प्रथमत:च डिजिटल पद्धतीने होत असून, जनगणना प्रक्रियेच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त मास्टर ट्रेनर यांचेमार्फत एकूण ४५ फील्ड ट्रेनर्सना ६ ते ८ एप्रिल २०२६ या कालावधीत सखोल प्रशिक्षण देण्यात आले आहे. या प्रशिक्षणामध्ये डिजिटल ॲपचा वापर, माहिती संकलनाची पद्धत तसेच नागरिकांशी संवाद साधण्याचे कौशल्य अशा विविध बाबींचा समावेश होता. अशा प्रशिक्षित फील्ड ट्रेनर्समार्फत नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत येणा-या ८ चार्ज जनगणना कार्यालयांमार्फत ३,७९७ प्रगणक (Enumerators) व पर्यवेक्षक (Supervisors) यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.



आठ चार्ज जनगणना कार्यालयांतर्गत प्रगणक व पर्यवेक्षक यांनी दि. १६ मे पासून सर्व क्षेत्रामध्ये जनगणनेच्या कामास सुरूवात केली आहे. प्रत्येक प्रगणकास नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने चार्ज जनगणना अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, यांच्या स्वाक्षरीचे ओळखपत्र आणि आदेश देण्यात आले आहेत. विविध प्रसिध्दी माध्यमांद्वारे जनगणना कार्यात सहभाग घेऊन, आपली सत्य व संपूर्ण माहिती प्रगणकांना देण्याचे नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे.

प्रगणक जेव्हा घरी भेट देतील तेव्हा त्यांचे ओळखपत्र तपासून आपण स्वगणना केली असल्यास आपला SE ID त्यांना द्यावा अथवा त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत, ती ते नोंदवून घेतील आणि आपल्या घराची घरगणना प्रकिया पूर्ण होईल. जनगणना अधिकारी नागरिकांकडे कोणत्याही बँक खात्याची अथवा आधारकार्ड, पॅनकार्ड बाबतची माहिती मागत नाहीत, याची नागरिकांनी नोंद घ्यावी व अशा प्रकारची माहिती मागणा-या तोतयांपासून सावध रहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# लाडक्या नगरसेवकांच्या वाढदिवसानिमित्त ‘राजे शिवाजी’ चित्रपटाचे आयोजन; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद









**नवी मुंबई** : तुर्भे विभागातील लाडके नगरसेवक म्हणून ओळख असलेल्या नेत्यांच्या वाढदिवसानिमित्त गुरु सूर्यवंशी यांच्या वतीने विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त नागरिकांसाठी ‘राजे शिवाजी’ चित्रपटाचा विशेष शो आयोजित करण्यात आला.

कोपरखैरणे येथील बालाजी थिएटरमध्ये सुरेश कुलकर्णी यांच्या हस्ते केक कापून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर ‘राजे शिवाजी’ चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले.

यावेळी तुर्भे विभागातील नागरिक मोठ्या संख्येने चित्रपट पाहण्यासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. उपस्थितांनी या उपक्रमाबद्दल गुरु सूर्यवंशी यांचे आभार व्यक्त करत वाढदिवसाच्या शुभेच्छाही दिल्या.

सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमातून नागरिकांशी नाळ जोडण्याचा प्रयत्न असल्याची भावना यावेळी उपस्थितांमध्ये व्यक्त करण्यात आली.

# वाशी कार्यक्षेत्रातील अतिधोकादायक व अयोग्य इमारतींवर कारवाई



**नवी मुंबई** : महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सी विभाग वाशी कार्यक्षेत्रातील सी-१ (अतिधोकादायक,राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्काशीत करणे) या प्रवर्गात घोषित करण्यात आलेल्या इमारतींचे मा.आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे आदेशान्वये व उपायुक्तसंजय शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार सी विभाग कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त श्री. सुखदेव येडवे यांच्या नियंत्रणाखाली पुढील नमूद केलेल्या इमारतींवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

१.जय महाराष्ट्र,जे एन-२ टाईप अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन,भु.क्र.४ से.९ वाशी (बिल्डींग नं.३१ ते ४६) १६ इमारती (पाणी पुरवठा व विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला आहे.)

२. फ्लॉवर को. ऑप. हौ.सो. लि जेएन-४ टाईप (बिल्डिंग नं. ९) से.९ वाशी (पाणी पुरवठा व विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला आहे.)

३.मे.नुर को ऑप हौ सो लि,प्लॉट नं-१८,सेक्टर-०९ए,वाशी,नवी मुंबई.(पाणी पुरवठा व विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला आहे.)

४. ए टाइप अपार्टमेंट ओनर्स असो. इमारत क्र. डी-१,ते इमारत क्र. डी-४,से.१,वाशी (पाणी पुरवठा व विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला आहे.)

या धडक मोहिमेसाठी पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी/कर्मचारी, विद्युत पुरवठा विभागाचे अधिकारी/कर्मचारी,अतिक्रमण विभागाचे अधिकारी/कर्मचारी,अतिक्रमण पोलीस व स्थानिक पोलिस स्टेशनचे कर्मचारी उपस्थित होते.

यापुढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सारवानांनी घेतला नमुंमपा कामकाजाचा आढावा





**नवी मुंबई** : महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सारवान यांनी नवी मुंबई महानगरपालिका येथे भेट देत सफाई कामगारांच्या विविध विषयांबाबत सविस्तर आढावा घेतला.नवी मुंबईच्या महापौर श्रीम.सुजाता पाटील व महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी महानगरपालिकेच्या वतीने त्यांचे स्वागत केले.

महानगरपालिकेत यांत्रिकी पध्दतीने मलनि:स्सारण वाहिन्यांची सफाई आधीपासूनच केली जात असून दूषित गटारांमध्ये एकाही कामगाराचा मृत्यू झालेला नाही तसेच स्वच्छतेबाबत नवी मुंबईचे कामही इतरांनी अनुकरण करावे असे असल्याचे मत उपाध्यक्ष मुकेश सारवान यांनी व्यक्त केले.

सफाई कामगारांच्या विविध मागण्यांबाबत आयोग सकारात्मक काम करीत असून शासन मंजूरीशी संबंधित बाबींवर आयोग प्रभावीपणे पाठपुरावा करील असे ते म्हणाले पंचवीस वर्षे किंवा त्याहून अधिक सेवा झालेल्या सफाई कामगारांना मोफत सदनिका देण्याबाबतच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सिडकोकडे जागा उपलब्धतेसाठी आयोगामार्फतही प्रयत्न केले जातील असे त्यांनी सांगितले.

# सानपाडा दूषित पाण्याच्या विळख्यातून मुक्तता करण्याची माथाडी नेते पांडुरंग आमले मागणी

**नवी मुंबई** : सानपाडा नोड (कॉलनी), सानपाडा गाव, सानपाडा पामबीच वसाहत सानपाडा नोडची दूषित पाण्याच्या विळख्यातून मुक्तता करण्याची मागणी अखिल भारतीय माथाडी संघटनेचे नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांच्याकडे एका लेखी निवेदनातून केली आहे.

गेल्या काही दिवसांपासून सानपाडा नोड (कॉलनी), सानपाडा गाव, सानपाडा पामबीच वसाहत येथील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये पिवळसर रंगाच्या दूषित पाण्याचा पुरवठा होत आहे. पाणी उकळून व गाळून घेतले तरी पाण्याचा पिवळसरपणा जात नाही. या दूषित पाण्यामुळे परिसरातील अनेकजण आजारी पडले आहेत. या दूषित पाण्याच्या समस्येचे निवारण न झाल्यास अनेकांच्या जिविताला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

पावसाळा आता काही दिवसांवर आलेला आहे. पावसाळ्यात सुरुवातीच्या दिवसात गढूळ पाणी येते. त्यामुळे तातडीने दूषित पाण्याच्या समस्येचे निवारण करुन सानपाडा नोड (कॉलनी), सानपाडा गाव, सानपाडा पामबीच वसाहतमधील जनतेला दिलासा देण्याची मागणी माथाडी नेते पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

हे साप्ताहिक मालक-मुद्रक-प्रकाशक-संपादक **श्री.संजू प्रल्हाद गुरव** यांनी रोशन प्रिन्टर्स, हिरा मनिषा अपार्टमेंट, गाळा नं. ७, शिवाजी रोड, लाईन आळी, पनवेल, जि. रायगड (महाराष्ट्र) -४१०२०६ येथे छापून एसएस-२, रुम नं.२१०, सेक्टर १६, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९ येथून प्रकाशित केले. **संपादक- श्री.संजू प्रल्हाद गुरव, मुख्य कार्यालय** : बी-२४, महावीर मार्केट, से.- १८, वाशी, नवी मुंबई. **पनवेल ऑफिस** : मोरबे गाव, द्वारका हौ.सोसा.बी-६ए ०१, **भ्रमणध्वनी: ९२२०७०४०९०. कायदेविषयक सल्लागार** : श्रद्धा खाडे-शहा